Publication: Mumbai Chauffer

Page: 8

Date: April 25th, 2011

# GARWAR MOTORS LAUNCHES SUPERBIKES

## अर्जुनचे 'धूम स्टार्स'ना आव्हान

बॉलीवूडचा स्टार अर्जून रामपालने गरवारे मोटर्सची ह्योसंग नावाची सुपरबाईक खरेदी केली आहे. विशेष म्हणजे अर्जुन रामपाल गरवारे मोटर्सच्या बाईकचा भारतातील पहिला ग्राहक ठरला आहे. त्याने सहा लाख रुपये किमतीची 'एसटी ७' ही क्रुझर बाईक विकत घेतली आहे. आता तो या बाईकने बॉलीवूडमधील 'धूम' स्टार्सशी रेस लावू इच्छितोय.

गरवारे मोटर्सच्या या क्रुझर बाईकचे नुकतेच अनावरण करण्यात आले. त्यावेळी अर्जुन रामपाल म्हणाला की, 'वयाच्या अकराव्या वर्षापासून मी बाईक चालवत आहे. आतापर्यंत बऱ्याचशा बाईक्स चालविल्या आहेत. त्यामध्ये जर काळ्या रंगाची बाईक असेल तर मला आनंद वाटतो. माझे बाईक चालवणे आईला आवडत नाही. त्यामुळे महाविद्यालयात असताना मी माझ्या मित्रांच्या बाईक चालवायचो. आईमुळेच मला माझ्या आयुष्यातील सर्वात प्रथम मोपेड बाईक विकत घ्यावी लागली होती. त्यानंतर बॉलीवूडमध्ये आल्यानंतर मी अनेक स्पोर्ट्स बाईक खरेदी केल्या. आता गरवारे मोटर्सची एसटी ७ क्रुझर बाईक खरेदी केली. ही बाईक हवेशी बाता मारते. त्यामुळे बाईक चालवण्यात वेगळाच आनंद आहे, असे अर्जुनने सांगितले.

